Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL
MULTIDISCItPLINARY
QUARTERLY RESEARCH
JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - I,
January - March - 2020
English Part - II /
Marathi Part - II /
Hindi

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★
Khardi,
Tal. Shahapur,
Dist. Thane,
421 601

Ajanta Prakashan

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठवाड्यातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य आणि शाश्वत विकास: एक सर्वेक्षण<br>**Dr. Shwetambari Kanakdande** | १-६ |
| २ | 'उघडा दरवाजा' आत्मकथेतील पर्यावरण<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | ७-१० |
| ३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील पर्यावरणीय जाणीवा<br>**प्रा. कैलास कळकटे** | ११-१५ |
| ४ | पर्यावरण आणि सामाजिक समस्या<br>**प्रा. कांबळे रावसाहेब हरिबा** | १६-२० |
| ५ | इतिहास आणि पर्यटनातील पर्यावरण<br>**प्रा. लक्ष्मण नारायण भोईर** | २१-२४ |
| ६ | मुंबई शहरातील मिठी नदीच्या पुराची कारणे, त्याचे परिणाम आणि पुरव्यवस्थापन : एक भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. विशाल संपत भोसले** | २५-३३ |
| ७ | १९८० नंतरच्या कवितेतून चित्रित झालेले नैसर्गिक, सांस्कृतिक पर्यावरण - एक शोध<br>**सहा. प्रा. राजश्री प्रदीप कदम** | ३४-३९ |
| ८ | बदलत्या पर्यावरणाचे आदिवासी कथा साहित्यातून झालेले चित्रण<br>**प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस** | ४०-४६ |
| ९ | भारतातील पर्यावरण चळवळ एक अभ्यास<br>**डॉ. ज्योती अरविंद पोटे** | ४७-६० |
| १० | आधुनिक युद्धतंत्र नागरी संरक्षण<br>**प्रा. गणेश धर्मा थोरात** | ६१-६७ |
| ११ | पर्यावरणाविषयी अपुरी सामाजिक जागृती'<br>**प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे** | ६८-७१ |
| १२ | भौगोलिक पर्यावरणातील संदर्भ आणि कविता : अर्थ आणि अन्वयार्थ (यशवंत मनोहरांच्या 'केशवसुत' कवितेसंदर्भात)<br>**डॉ. संदीपान श्रीमंत नवगिरे** | ७२-७६ |
| १३ | पर्यावरनाच्या जनजागृती मधील प्रसार माध्यमाचा भूमिका<br>**प्रफुल इंगोले** | ७७-७९ |
| १४ | बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी : पाचोळा<br>**प्रा. भारती घोलप** | ८०-८४ |
| १५ | जलसंवर्धनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>**प्रा. सरोज आगवाले** | ८५-८७ |


Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील पर्यावरणीय जाणीवा

प्रा. कैलास कळकटे
मराठी विभागप्रमुख, जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी,
ता. शहापूर, जि. ठाणे.

## प्रस्तावना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी खेडे स्वंयपूर्ण व्हायला पाहिजे. या तत्वज्ञानाने प्रेरित होऊन ग्रामसुधारणेची चळवळ हाती घेतली. त्यासाठी ते खेड्यापाड्यांतून फिरत असे व ग्रामसुधारणेसाठी प्रचार करत करत असे. त्यावेळी त्यांना एक जाणीव झाली की, ग्राम सुधारणेसाठी कायम स्वरूपी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. त्यासाठी मग त्यांनी विदर्भातील मोझरी येथे आश्रम काढला. तिथे स्वंयसेवक तयार करून त्यांना खेड्यापाड्यात पाठविल्या जात असे. व त्यातून पुढे ग्रामगीता या ग्रंथाची निर्मिती झाली आहे.

ग्रामगीता या ग्रंथात ४१ अध्याय आहेत आठपंचकामध्ये विभागणी केलेली आहे. ग्रामाची संपुर्ण सुधारणा करायची असल्याने ग्रामीण जीवनातील सगळ्या विषयांना त्यात स्पर्श केला आहे. हे आठ पंचक पुढीलप्रमाणे

१)सदधर्ममंथन पंचक २)लोकवशीकरण पंचक ३)ग्रामनिर्माण पंचचक

४)दृष्टिपरिवर्तन पंचक ५) संस्कारशोधन पंचक ६) प्रेमधर्मस्थापना पंचक

७) देवत्वसाधन पंचक ८) आदर्श जीवन पंचक

थोडक्यात खेड्यात जन्म घेतल्यापासून ते मृत्यू होईपर्यंतच्या सगळ्या बाबींचा विचार या ग्रंथात करण्यात आलेला आहे.

या ग्रंथाच्या निर्मितीमागे तुकडोजी महाराजांची तळमळ दिसून येते

अरे ! उठा उठा श्रीमंतांनो ! अधिका-यांनो ! पंडितांनो !
सुशिक्षितांनो ! साधुसंतांनो ! हाक आली क्रांतीची ||१||
गावा गावासि जागवा । भेदभाव हा समूळ मिटवा ||
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ||२||

या दोन ओळीतून ग्रामगीताचा उद्देश व सार आपल्या लक्षात येतो.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

### पर्यावरणीय जाणीवा

पर्यावरणीय जाणिवांच्या अंगाने संतसाहित्याचा शोध घेताना परिस्थितीविज्ञान ही संकल्पना विचारात घेणे महत्वाचे ठरते. परिस्थितीविज्ञान (Ecology) ही संज्ञा सर्वप्रथम जर्मन प्राणीशास्त्रज्ञ ई.एच हेकेल यांनी प्राणी त्यांचा परिसर यांच्या परस्पर संबंधाच्या अभ्यासाच्या जीवविज्ञानाच्या शाखेसाठी वापरली.ही संकल्पना अ महत्वपूर्ण आहे. तसेच या संकल्पनेच्या अंतर्गत असणारी विधिवास (इकोसिस्टिम) ही संकल्पना ही महत्त्वा आहे. " विधिवास म्हणजे प्राणिमात्रांचा निवास ज्या सजीव - निर्जीव नैसर्गिक पर्यावरणात असतो. तो निवास पर्यावरणीय विधिवासाचा परिणाम त्यातील सर्वच सजीवांवर होत असतो त्याचप्रमाणे सजीवांचा परिणाम पर्यावरणावर होत असतो." [१] याबाबतीत रा. ग जाधव यांनी' पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य ' या ग्रं विस्तृत मांडणी केली आहे. परिस्थितीविज्ञान या संकल्पनेविषयी ते म्हणतात " परिस्थितीविज्ञान हे माणसा पर्यावरणबद्ध व पर्यावरणबाधक वर्तनाच्या समस्यांना नेमकेपणाने शोधणारे व त्यातून निराकरणाचे दाखविणारे शास्त्र आहे.माणसाचे स्वास्थ्य व आरोग्य टिकावे ,अन्न व ऊर्जा यांचे मानवोपकारक असे पर्याव चक्र निर्वेधपणे चालत राहावे व सृष्टीजातीतील सजीव - निर्जीव संबंधाला व अधिवासाला समतोलपणा प्राप्त यासाठी परिस्थिती विज्ञानाचा खूप मोठा उपयोग आहे. " [२]

यातूनच पुढील कालखंडात ' सांस्कृतिक पर्यावरण ' ही संकल्पना उदयास आली.ही संकल्पना मुळात व त्यांचा नैसर्गिक परिसर किंवा अधिवास यांच्या एकात्मेवर अधिष्ठित आहे.परस्परांच्या अस्तित्वाला ठरणारे जीवशास्त्रीय नाते या संकल्पनेत गृहीत धरले आहे. " मानवी समाज ,संस्कृती आणि पर्यावरण परस्पर संबंधातील एकात्मता ,परस्परबध्दता , सारभूत संस्कृतीविशेष आणि आदानप्रदान पध्दती इत्यादी महत्त्वाच्या व अर्थपूर्ण आहेत. त्या तशा आहेत,असे मानूनच पुढे जाणे. अधिक संशोधन करणे व सां पर्यावरणाची संकल्पना क्रमशः विशद करत जाणे. एवढेच आपल्या हाती आहे." [३] सांस्कृतिक पर्याव संकल्पनेत मानवी समाज, संस्कृती आणि पर्यावरण यांच्या परस्पर संबंधातील एकात्मतेवर भर देण्यात आहे.

### ग्रामगीतेतील पर्यावरणीय जाणीवा

ग्रामगीतेमध्ये स्वतंत्रपणे पर्यावरणीय जाणीवा व्यक्त झालेल्या नाहीत. ग्रामसुधारणेसाठी त्यांनी जो केलेला आहे. त्यामाध्यमातून सुट्यासुट्या स्वरूपात या जाणीवा आढळून येतात.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

आज शेतकरी मोठ्याप्रमाणात उत्पादन घेण्यासाठी रासायनिक खतांचा वापर करत आहे. त्यामुळे अनेक रोग पीकांवर पडत आहे. शेतीच्या उत्पादनापेक्षा जास्त खर्च हा शेतीमालाच्या उत्पादनावर होत आहे आणि त्यातील ९० टक्के खर्चहा रासायनिक खते व औषधी यांच्यावर होत आहे. त्यामुळे जमीनीचा कस देखील कमी होत आहे. पण यावर तुकडोजी महाराजांनी अगोदरच मार्ग सांगितलेला आहे.

गोव-या करोनी जाळिती | ते महालाभास आचवती |
शेणात आहे लक्ष्मीची वसती | धर्मग्रंथीहि वचन ऐसे ||६६||
म्हणोनि सर्व गावाचे मलमूत्र | जमवोनि झाकावे जाणोनि तंत्र |
त्याने गावाची जमीन सर्वत्र | खतवोनि घावी || ६७||
याने दूर होईल घाण |थांबेल रोगराईचे नुकसान|
आणि पिकेल अधिक धान्य| अनेक लाभ एकामाजी ||६८||

(अध्यया ११)(४)

शेणखताचा वापर करून आपण अधिक पीककसे घेऊ शकतो हे वरील ओळीतून दिसून येते.

घराच्या समोर परसबाग असणे किती गरजेचे आहे हे शासनाच्या आज लक्षात आले त्यामुळे वेगवेगळ्या शाळांमध्ये परसबागेचा उपक्रम राबविल्या जात आहे.तसेच आलिकडच्या काळात प्रत्येक घरासमोर एक तरी झाड असले पाहिजे यासाठी प्रयत्न केल्या जात आहे .पण ग्रामगीतेतील ग्रामनिर्माण पंचकाच्या ग्रामनिर्माणकला या तिस-या भागात ग्रामाची रचना कशी असावी या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केलेले आहे.व त्यामध्ये गावात झाडे कशी लावावी या संदर्भात मार्गदर्शन करताना ते म्हणतात.

झाडे दिसती ओळीबद्ध | सरळ सुंदर,हिरवी शुद्ध|
घरमालकचि करी खुद्द| काम आपुल्या हातांनी||४२||
घराभोवती बाग केली |सांडपाण्यावरि झाडे वाढली|
फळाफुलांची रोपे वेली|भाजीपाला नित्याचा||४३||

(अध्याय १३)(५)

एका अहवालाप्रमाणे दरवर्षी जवळपास ३० टक्के जंगल हे वेगवेगळ्या प्रकारच्या आगीमुळे [illegible] त्यातही प्रामुख्याने शेतीकामाच्या संदर्भात ज्या आगी लावल्या जात आहे.त्यामुळे [illegible] नुकसान होत आहे.ते जर होऊ घाचे नसेल तर का काळजी घेतली पाहिजे व [illegible]

भागात असते अनेकदा ही जनावरे उघड्यावरच मरून पडलेली असतात .त्यामुळे रोगराई पसरते त्यामु... विल्हेवाट कशी लावावी यासंदर्भात उपदेश करताना ते म्हणतात.

फास .गवतगंजी .कडबागूड । भूस उपणणे अथवा खळवाड।
कुंभार - आवा .अग्निकुंड।सुरक्षित जागा नेमाव्या त्यांच्या ॥७९॥
मेली जनावरे कोठेहि नेली।गावभरि घाण,मांसहाडे आली।
ऐसे न व्हाया पाहिजे नेमेली।जागा उधडण्या -गाडण्याची॥८०॥

(अध्याय १३)[6]

गाय या प्राण्याला हिंदुधर्म ग्रंथामध्ये मोठ्याप्रमाणात महतव देण्यात आलेले आहे.अगदी तिच्या... तेहेतीस कोटी देवांचा वास असतो.एवढे महतव गाईला देण्यात आले आहे. तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या... अध्यायांपैकी १५ वा अध्याय हा गोवंश –सुधार या विषयावरच लिहिलेला आहे.पण यात कुठे कर्मकांड या स्व... गायीची महतव न सांगता शास्त्रीय पध्दतीने त्यांनी ग्रामजीवनातील गाईचे महत्त्व विशद केले आहे.

गायीचा आरोग्यासाठीचा फायदा,शेतीसाठीचा फायदा,जोडधंदा याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले आ... म्हणतात.

गोमय,गोमूत्र,मिळोनि रात्रंदिसा।कायम होता भूमीचा कस।
पेवे भरती गावागावास।धान्याची तेव्हा॥१०॥
भूमी आणि जनावरे।हीच उत्पतीची कोठारे।
एकाची अनेक होती खिल्लारे।जोडधंदा हा घरोघरी॥११॥
तिच्या शेणाने पिके शेती।शेती देई सुखसंपति।
म्हणोनीच शेणामाजी लक्ष्मीची वसती।वर्णिली असे॥२२॥

(अध्याय १५)[7]

## समारोप

या सारख्या अनेक उपदेशपर ओव्यांच्या माध्यामातून ग्रामगीतेतून पर्यावरणीय जाणीवा व्यक्त होतात पण त्या सगळ्याच पर्यावरणासंदर्भात नाहीत.तर पर्यावरणाला पुरक असणा-या इतर ज्या गोष्टी आहेत त्यासंदर्भात देखील आहे.त्यामुळेच ख-या अर्थाने ग्रामगीता ही ग्रामसुधारणेची गीताच आहे.ग्रामगीतेचा उद्देश ग्रामसुधारणा हाच आहे. त्यामुळे ग्रामीण पर्यावरण व त्यासंबंधीच्या अनेक गोष्टी ग्रामगीतेतून येत...

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421601

नावाहून जरी धार्मिक वाटत असली व ओवी या रचनाप्रकारात लिहिलेली असलेली तरी ती तिचे स्वरूप धार्मिक नाही तर सामाजिक आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास

ग्रामगीता नव्हे पारायणासी |
वाचता वाट दावी जनासी |
समूळ बदलवी जीवनासी |
मनी घेता अर्थ तिचा |

**संदर्भसूची**

१. जाधव रा.ग ,पर्यावरणीय प्रबोधन आणि मराठी कविता पृ ३७७ ,मराठी कविता परंपरा आणि दर्शन (संपा.रविंद्र शोभणे) ,विजय प्रकाशन नागपूर,प.आ २००६

२. जाधव रा.ग ,पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य,पृ १३

३. तत्रैव पृ ९१

४. संपा माधव राजगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित ग्रामगीता,पृ१३२ ,महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळ,मुंबई ,पुनर्मुद्रण २००३

५. तत्रैव पृ १४०

६. तत्रैव पृ १४३

७. तत्रैव पृ १६०-६१